MHPU180021622016

**नि.दि.दा.क्र. ३०५/२०१६**
**( प्रविण वगैरे वि. यशवंत वगैरे)**

**निशाणी ३३ वरील आदेश**
(दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१९ रोजी पारित)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, प्रतिवादींनी वादीच्या मालकीचे दावा जमीनीमध्ये केलेले ०० हे. १३ आर. चे अतिक्रमण काढुन द्यावे म्हणुन सदरचा दावा दाखल केला आहे. त्यामध्ये प्रतिवादींना नोटीस बजावणी झाली आहे, त्यामध्ये प्रतिवादीने आपली कैफियत देवुन दाव्यातील नमुद मो.र.नं. १४११/२०१३ ही मोजणी नाकारली आहे. त्यामुळे वादीने मे. न्यायालयात नि. २७ ला कोर्ट कमिशनरचा अर्ज मंजुर होवुन अधिक्षक भुमि अभिलेख दौंड यांनी मे. कोर्टाचे आदेशाप्रमाणे सदर गट नं. ५७१ व ८२४ ची संयुक्त मोजणी करुन मे. न्यायालयात दावा दाखल केला आहे. त्यामध्ये दोन्ही गटातील बांध दाखवुन प्रतिवादी यांनी वादींच्या दावा नं. ५७१ मध्ये पुर्व बाजुने दक्षिण—उत्तर असे सुमारे १४ आर क्षेत्राचे अतिक्रमण केल्याचा मोजणी नकाशा दाखल केलेला आहे. त्यानुसार सदर दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आणि गरजेचे झाल्याने सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

३. वादींनी मे. न्यायालयात जो दावा दाखल केला आहे त्यामधील परिच्छेद नं. **'४अ'** नंतर दुरुस्तीच्या अर्जातील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे परिच्छेद नं. **'४अ'** नंतर **'४ब'** हा नवीन उपपरिच्छेद समाविष्ठ

करण्याची तसेच परिच्छेद क्र. **'८अ'** मध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे क्षेत्राची दुरुस्ती करण्यासाठी मे. न्यायालयाची परवानगी मिळावी.

४. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक आणि आवश्यक स्वरुपाची असुन सदरील प्रतिवादी यांनी दावा दाखल करुन देखील वादींच्या हद्दीत अतिक्रमण करुन त्रास देणे थांबविणे नसल्याने वादींनी मे. न्यायालयात मनाईचा अर्ज देखील केला आहे. प्रतिवादींच्या गैरकृत्यामुळेच सदरील १३ आर चे अतिक्रमण हे १४ आर. झाले. त्यामुळे, दुरुस्ती करणे भाग पडले आहे. सदरील दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात आणि मागणीत कोणताही बदल होत नाही, अगर प्रतिवादींच्या बचावास कोणतीही बाधा येत नाही. सदरील दुरुस्तीस परवानगी न दिल्यास वस्तुस्थिती मे. न्यायालयापुढे येणार नाही, त्यामुळे वादाचे अंतिम निराकरण होणार नाही व वादीच्या हक्कावरच गदा येईल व वादीचे कधीही न भरुन येणारे अतोनात नुकसान होणार आहे. तरी अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळण्याचा अनुतोष मागीतला आहे.

५. प्रस्तूतच्या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देवुन आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे म्हणणे असे की, वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा दुरुस्तीसाठी केला आहे. सदर वादी यांनी मोजणीदार यांना हाताशी धरुन दावा मिळकतीची मोजणी करुन घेतली आहे. मोजणीचे वेळी दावा मिळकतीमध्ये असलेले जुने नंबराचे दगडावरुन मोजणी न करता वादीचे सांगणेवरुन दावा मिळकतीच्या हद्दी निश्चित करुन मोजणी केली आहे व त्या खोटया मोजणीचे आधारे दावा दुरुस्तीचा अर्ज दिला आहे. सदर दुरुस्तीने दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार आहे व प्रतिवादी यांनी कोणतेही अतिक्रमण केले नसताना सुध्दा खोटा मोजणी नकाशा तयार करुन मे. न्यायालयात दाखल केला आहे. तरी विनंती की, वादीचा अर्ज नामंजूर करावा.

६. अर्जदारांचे व प्रतिवादींचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारांच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, वादी दावा प्रलंबित काळात घडलेल्या बाबी अभिलेखास आणु इच्छित आहे. त्यामुळे, अर्जदारास अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी द्यावी. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, मोजणीचे वेळी दावा मिळकतीमध्ये असलेले जुने नंबराचे दगडावरुन मोजणी न करता वादीचे सांगणेवरुन दावा मिळकतीच्या हद्दी निश्चित करुन मोजणी केली आहे व त्या खोटया मोजणीचे आधारे दावा दुरुस्तीचा अर्ज दिला आहे. म्हणून, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

७. प्रस्तूत अर्जाचे व दाव्याचे अवलोकन केले असता अर्जदार प्रस्तावित दुरूस्ती अन्वये दावा प्रलंबित काळात घडलेल्या घडोमोडी दाव्याच्या अभिलेखास आणू इच्छित आहे. सदर बाबी त्याने अर्जामध्ये परिच्छेद नं. २ मधील प्रस्तावित परिच्छेद ४ब तसेच परिच्छेद क्र. ८अ मध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे क्षेत्राची दुरुस्ती दाव्याच्या अभिलेखास आणु इच्छित आहे. दावा अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होत असल्याचे दिसून येत नाही. वादीने प्रस्तावित दुरुस्ती अन्वये कोणतीही कबुली काढून घेतलेली नाही.

८. दावा मिळकतीच्या क्षेत्रामध्ये दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादींना काय अडचणीचे ठरणार आहे हे प्रतिवादींनी दर्शवून दिलेले नाही. अतिक्रमित क्षेत्रात दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादीच्या बचावास कोणतीही बाधा येत नाही. दाव्यात पुराव्यास सुरुवात झालेली नाही. त्यामुळे, प्रतिवादींना प्रस्तावित दावा दुरूस्तीमुळे काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तुतच्या दुरुस्तीने दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक

वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी कुठल्याही प्रकारे नवीन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख—या वादाच्या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक वाटते. तरी वरील सर्व कारणांचा विचार करुन पुढील आदेश पारीत करीत आहे:—

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारांस अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. अर्जदारांनी दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत करून घ्यावी.

दौंड.
दिनांक : ०९/१०/२०१९

(एन. बी. जाधव)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, कोर्ट क्र.१.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. N. B. Jadhav, Civil Judge Junior Division, Daund [Court No.1]. |
| Name of the Steno | : | Miss. F. J. Bijapure, Steno Grade-3. |
| Judgment date | : | 09/10/2019. |
| Judgment signed by P.O. on | : | 09/10/2019. |
| Judgment uploaded on | : | 10/10/2019. |